# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २ जून, २०२२

---

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) तरुणांनी देशभक्ती जोपासली तर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्वप्नातील समर्थ भारत घडू शकतो. तरुणांनी त्यांच्यामध्ये असलेल्या प्रतिभेचा वापर समर्थ भारत घडविण्यासाठी करावा असे प्रतिपादन सिने अभिनेता योगेश सोमण यांनी बहिणाबाई व्याख्यानमालेत केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तारसेवा विभागाच्यावतीने या ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे हे होते. यावेळी बोलतांना सोमण पुढे म्हणाले की, आपल्यात प्रचंड आत्मविश्वास व कष्ट करायची तयार असेल तर आपण खात्रीपूर्वक यशस्वी होऊ शकतो. भारतीय लोक देशात व देशाबाहेर मोठया पदांवर काम करत आहेत. मात्र कुठेही गेले तरी देशाची संस्कृती विसरु नये असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात प्रा.इंगळे म्हणाले की, सावरकांचे देशाप्रती प्रचंड प्रेम होते. त्यांच्या पुस्तकातून देशाप्रती अखंड भक्ती जाणवते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष पवार तर सुत्रसंचालन कल्याणी महाजन हिने केले. परिचय डिंपल पवार हिने तर आभार वर्षा परदेशी या विद्यार्थिनींनी केले. या प्रसंगी सुमारे १०० जण ऑनलाईलन उपस्थित होते अशी माहिती विभागाकडून देण्यात आली आहे.

---

**बातमी क्र. २**

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एकत्रित संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने भारत सरकाच्या टीसीआयएल कंपनीने आपल्या प्रस्तावाचे सादरीकरण केले.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात टीसीआयएलच्या सह महाव्यवस्थापक श्रीमती शिखा सिंह यांनी कशा पध्दतीने संगणकीकरणाच्या सुविधा देता येतील याबाबतची सविस्तर माहिती दिली. कंपनीचे अतिष बियाणी व प्रतिक बियाणी यांनी देखील या सॉफ्टवेअर विषयी माहिती दिली. कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल यांनी प्रास्ताविक केले. सहायक पूर्वलेखक जितेंद्र शिरसाट यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सुरेखा पाटील यांनी आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी